# मिरा भाईंदर महानगरपालिका

## अग्निशमन विभाग

## // प्रेस-नोट//

- कस्तूरी हाईट्स, इंद्रलोक फेज ६, आर. बी. के. स्कूल समोर भाईंदर (पूर्व) येथील आगीवर नियंत्रण मिळवण्यास मिरा भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागास यश.

दि. ०९/१२/२०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कस्तूरी हाईट्स, इंद्रलोक फेज ६, आर. बी. के. स्कूल समोर भाईंदर (पूर्व) परिसरात लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळविण्यात अग्निशमन विभागास यश प्राप्त झाले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या कनकिया अग्निशमन स्थानकास दि.०९/१२/२०२५ रोजी सकाळी ठिक ११:३० वाजता वर्दी प्राप्त झाली असून कस्तूरी हाईट्स, इंद्रलोक फेज ६, आर. बी. के. स्कूल समोर भाईंदर (पूर्व) येथे आग लागल्याची माहिती प्राप्त झाली. माहिती प्राप्त होताच तात्काळ सदरच्या वर्दीवर कनकिया अग्निशमन दलाचे अधिकारी व कर्मचारी अग्निशमन वाहन क्र. एम एच 04 ए एन ३९५६ घटनास्थळी रवाना झाले व ठिक ११:३४ मिनिटानी घटनास्थळी पोहचुन पाहणी केली असता सदरची आग ही कस्तूरी हाईट्स या इमारतीच्या ईलेक्ट्रिक डकला लागल्याचे निदर्शनास आले. तात्काळ सदरच्या आगीवर अग्निशमन वाहनांच्या साह्याने होजची लाईन टाकुन आग विझविण्यास सुरुवात केली. सदरची आग ही इमारतीच्या इलेक्ट्रिक डक पासून इमारतीच्या वरच्या बाजूस आगीचा आवाका वाढत असल्याने तात्काळ स्व. कल्पना चावला अग्निशमन स्थानक, सिल्वरपार्क अग्निशमन स्थानक व नवघर अग्निशमन स्थानक या तीन अग्निशमन स्थानकातील अधिकारी व कर्मचारी यांना अग्निशमन वाहनांसह पाचारण करण्यात आले. त्या इमारतीमधील अदानी इलेक्ट्रिसीटी कर्मचा-यांना पाचारण करुन विद्युत पुरवठा तात्काळ खंडीत केला त्याचबरोबर महानगर गॅसच्या कर्मचा-यांना पाचारण करुन तेथील गॅस पाईप लाईन देखील तात्काळ बंद केली. आगीचे वाढते प्रमाण व निर्माण झालेल्या धूरामुळे इमारतीमधील अंदाजे २१५ लोकांना तात्काळ इमारतीमधुन सुरक्षितपणे बाहेर काढुन इमारत खाली करण्यात आली. सदर आगीवर साधारणतः अंदाजे १५ ते २० मिंनटात पुर्ण आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले व आग पूर्ण विझविण्यास अग्निशमन विभागास यश प्राप्त झाले. सदर आगीमुळे धुराचे कल्लोळ निर्माण झाल्याने सदर इमारतीमधील राहिवासीयांना श्वास घेण्यास अडचणी होत असल्याने तेथील रहिवाशी १) हिमांशु दुर्गाधर भट - वय वर्ष अडीच २) प्रियंका सिंग ३) अर्पण सिंग ४) वैभव सिंग ५) चंद्रिका देवी सिंग ६) पाल फॅमिलि, त्यांना अनुक्रमे शालोम रुग्णालय, पंडित भिमसेन जोशी रुग्णालय व भक्तिवेदांत रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती चांगली आहे.

तसेच सदरची इमारत ही तळ +१२ मजल्यांची असून तेथे एकूण ७२ सदनिका उपलब्ध आहेत. सदरच्या सदनिका आगीपासून पूर्णपणे वाचविण्यात आले. तसेच सदर घटनास्थळी कोणतीही जीवित हानी झालेली नाही. त्यामुळे घटनास्थळी निर्माण होणारा संभाव्य धोका टाळण्यात अग्निशमन विभागाला यश प्राप्त झाले आहे. तसेच सदर घटनास्थळी सिल्वरपार्क अग्निशमन स्थानक येथील वाहन क्र. एम एच 04 ई ०९३५, नवघर अग्निशमन स्थानकातील वाहन क्र. एम एच 04 एल ई ०९३६ व वाहन क्र. एम एच 04 ए

Scanned with OKEN Scanner

एन ३९५३ व स्व. कल्पना चावला अग्निशमन स्थानकातील वाहन क्र. एम एच 04 एल ई ०१३८, गुरखा वाहन, टी. टी. एल. वाहन क्र. एम एच 04 ई ६८६८ अशी अग्निशमन विभागाची एकुण 0६ अग्निशमन वाहने तसेच ९ अग्निशमन अधिकारी व २० अग्निशमन कर्मचारी कार्यरत होते. तसेच नवघर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस अधिकारी व त्यांचे अधिनस्त पोलीस कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते. तसेच मुख्य अग्निशमन अधिकारी सदर आगीच्या वर्दीवर हजर होते. व त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्णपणे आग विझविण्यात आली. सदर घटनास्थळी लागलेल्या आगीची माहिती वेळोवेळी माननीय वरिष्ठांना दिलेली आहे. सदर घटनास्थळी लागलेली आग ही विझलेली असून तेथील परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आलेली आहे. मा. आयुक्त श्री. राधाबिनोद शर्मा यांनी सदर घटनेची माहिती घेऊन तात्काळ आग नियंत्रणात आणणेकरिता सर्व आवश्यक उपाययोजना करणेबाबत निर्देश दिले होते.

(डॉ. सचिन बांगर)
उप- आयुक्त (अग्निशमन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner